संदर्भ: लोकसत्ता आवृत्ती : पुणे दि. ११ जानेवारी २०१९ पान नं. ३

# ६९ टक्के उमेदवारांच्या मनात केवळ एमपीएससीच!

## विचारवेध असोसिएशनच्या पाहणीतील निष्कर्ष

**प्रतिनिधी, पुणे**

**पुण्यात राहून** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांपैकी ६९ टक्के उमेदवार अन्य कोणतेही शिक्षण किंवा नोकरी-व्यवसाय करत नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या उमेदवारांच्या मनात 'केवळ एमपीएससीच' असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विचारवेध असोसिएशन या संस्थेने केलेल्या पाहणीतून हा निष्कर्ष समोर आला. संस्थेने एमपीएससीच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांपैकी १०२ उमेदवारांशी संवाद साधला. या पाहणीतून विविध प्रकारची माहिती स्पष्ट झाली. त्यात ४८ टक्के उमेदवारांचे शिक्षण खेडेगावात झाले आहे. पुण्यातील भाड्याच्या एका खोलीत तीन ते सहा जण राहतात. राहणे, जेवण, शिकवणीचे शुल्क यासाठी वर्षाला सरासरी १ लाख २० हजार रुपये खर्च करतात. त्यातील ११ टक्के उमेदवारांना कर्ज काढावे लागले आहे. अभ्यासाच्या ताणामुळे ३४ टक्के उमेदवारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाला असला, तरी बहुसंख्यांच्या स्थितीत सुधारणा झाली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

सरकारी नोकरीमुळे समाजसेवेची संधी मिळते. कायमस्वरूपी प्रतिष्ठा वाढते, ही स्पर्धा परीक्षा देण्यामागील उमेदवारांची भावना आहे. सरकारी नोकरी मिळवणे कठीण असल्याने निम्म्याहून अधिकांनी अन्य पर्यायांचा विचार केला आहे. त्यातील २६ टक्के उमेदवारांनी त्यासाठीची पूर्वतयारी केली आहे, असेही स्पष्ट करण्यात आले.

लोकसत्ता Fri, 11 January 2019
https://epaper.loksatta.com/c/35692942